# उच्च शिक्षणासाठी पुणे नंदनवन

**म. टा. प्रतिनिधी**

'ऑक्सफर्ड ऑफ इस्ट' अशी ख्याती असलेल्या पुण्यात येत्या दहा वर्षांत उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सध्याच्या अडीच लाख विद्यार्थ्यांवरून १२ लाखांपर्यंत वाढणार आहे. एकीकडे शिक्षण क्षेत्रात ही झपाट्याची वाढ अपेक्षित असताना शहरातील शिक्षण संस्थांमधील संवादाच्या आणि कनेक्टिव्हिटीच्या अभावामुळे विद्यार्थ्यांपर्यंत या विस्ताराचा लाभ मिळणार का, असा प्रश्न शिक्षणतज्ज्ञांनी उपस्थित केला.

निमित्त होते विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष आणि शिक्षण तज्ज्ञ डॉ. अरुण निगवेकर यांनी लिहिलेल्या आणि उत्कर्ष प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या 'उच्च शिक्षण : समस्या आणि प्रवाह' या पुस्तकाच्या प्रकाशनाचे. कार्यक्रमात झालेल्या शहरातील उच्च शिक्षणविषयक चर्चासत्रात डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ. शां. ब. मुजुमदार, डॉ. राम ताकवले, डॉ. शिवाजीराव कदम आणि डॉ. विजय भटकर या शिक्षण क्षेत्रातील विचारवंतांनी भाग घेतला.

शिक्षण क्षेत्रात सध्या विकिपिडिया, यू ट्यूब, फेसबुकच्या माध्यमातून 'ओपन सोर्स मुव्हमेंट' सुरू आहे, त्याचा समावेश करत उच्च शिक्षणामध्ये आजपर्यंत दूर्लक्षित राहिलेल्या सामाजिकतेचा अंतर्भाव करायला हवा, असे मत डॉ. ताकवले यांनी मांडले.

पुण्याचा उल्लेख विद्येचे माहेरघर असा होत असताना, पुणे विद्यापीठातील दोन संशोधन संस्थांचाही परस्परांमध्ये संवाद नसतो. हे चित्र बदलत पुण्यातील शिक्षण संस्थेत प्रवेश घेतल्यावर गुणवत्तेच्या जोरावर अन्य राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या शिक्षण संस्थांमध्ये शिक्षणाची-संशोधनाची थेट संधी मिळू शकेल, असे आश्वासक चित्र तयार व्हायला हवे असे मत डॉ. भटकर यांनी व्यक्त केले.

उच्च शिक्षणामध्ये येत्या काळात विस्तारीकरण, सर्वसमावेशकता आणि गुणवत्ता या तिघांचा मेळ आपण कसा साधणार यावर भारतातील उच्च शिक्षणातील प्रगती अवलंबून राहिल, असे डॉ. माशेलकर म्हणाले.

विक्रम पटवर्धन




# 'क्लिक'वर पुस्तक पोचले जगभरात

## ▪ उच्च शिक्षणावरील 'ई-बुक'चे प्रकाशन

**म. टा. प्रतिनिधी**

पुस्तक मग ते कोणत्याही विषयावरचे असो, अगदी कम्प्युटर क्षेत्रासंबंधी असले तरी पुस्तक प्रकाशन सोहळा म्हणलं की व्यासपीठावरील चार मान्यवर गिफ्ट पॅकमधून ते पुस्तक हाती घेणार आणि 'पुस्तकाचे प्रकाशन झाले' असे जाहीर करणार असेच सर्वसाधारण चित्र डोळ्यांसमोर येतं. पण रविवारी झालेल्या एका पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रमाला हायटेक टेक्नॉलॉजीचीही जोड मिळाली. कारण यामध्ये प्रकाशित झालेले पुस्तक जगभरातील वाचकांपर्यंत 'ई-बुक'द्वारे एका क्लिकवरून पोचले!

डॉ. अरुण निगवेकर यांच्या आजवरच्या शिक्षण विषयक लेखांवरील 'उच्च शिक्षण : समस्या आणि प्रवाह' या पुस्तकाचे प्रकाशन पारंपरिक पद्धतीने तर झालेच पण याच्या ई-आवृत्तीचे प्रकाशन झाले ते थेट आयपॉडवरूनच! ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी आयपॉडवर क्लिक करून या पुस्तकाचे प्रकाशन केले. विशेष म्हणजे या वेळी व्यासपीठावर उपस्थित सर्व मान्यवर हे साठीच्या पुढचे होते! 'उच्च शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर वाढायला हवा' हे कानांना सरावलेले वाक्य यामुळे प्रत्यक्ष कृतीत उतरल्याचा अनुभव या वेळी उपस्थित प्रेक्षकांना मिळाला.

उच्च शिक्षणात सोशल नेटवर्किंगद्वारे ओपन रिसोर्स मुव्हमेंट आणण्यापासून, देशातील सर्व विद्यापीठे-शिक्षणसंस्था इंटरनेटवर जोडण्याचे महत्त्वाकांक्षी प्रकल्पही येत्या काळात प्रत्यक्षात उतरवण्याचा विश्वास कार्यक्रमात व्यक्त करण्यात आला. त्याची सुरुवातच कुठेतरी या ई-बुक प्रकाशनाने झाली असे म्हणायला हरकत नाही.